विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४९ वा | बुधवार, दि. १३ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः मात्र कोरडे पाषाण...

## मोदींच्या काटकसरीच्या आवाहनाला सोलापूरात हरताळ | पालकमंत्र्यांच्या बैठकीला 150 गाड्यांची गर्दी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इराण-अमेरिका आणि इस्त्राईल संघषार्मुळे जागतिक पातळीवर इंधन व गॅस टंचाईची भीती निर्माण झाली असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना काटकसरीचे आणि इंधन बचतीचे आवाहन केले आहे. मात्र, या आवाहनाचा सोलापुरातच फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीसाठी नियोजन भवनासमोर तब्बल १५० हून अधिक चारचाकी वाहनांची गर्दी झाल्याने नागरिकांतून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

जिल्ह्यातील विविध विकासकामे, नियोजन समितीवरील नियुक्त्या आणि आगामी बैठकींच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीसाठी आमदार, जिल्हा परिषद सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली. मात्र, देशभरात इंधन बचतीचा संदेश दिला जात असताना बैठकीच्या ठिकाणी वाहनांचा झालेला प्रचंड ताफा चर्चेचा विषय ठरला.

विशेष म्हणजे, सोलापूर जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी (ता. १५) होणार असून २२ मे रोजी नियोजन समितीची बैठक पार पडणार आहे.



या बैठकीपूर्वीच इंधन बचतीचे प्रत्यक्ष उदाहरण लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने घालून द्यावे, अशी मागणी समर्थ सोलापूर कृती समितीने केली आहे. 'जनतेला काटकसर सांगणाऱ्यांनी स्वतःपासून सुरुवात करावी,' अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

बैठकीदरम्यान नियोजन समितीवर पालकमंत्र्यांच्या कोट्यातून संधी मिळावी यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाली होती. अनेक आमदार, पदाधिकारी आणि विविध पक्षांचे कार्यकतेर्ही मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने नियोजन भवन परिसर वाहनांनी फुलून गेला होता.

**कोणाची किती वाहने ?**

- पालकमंत्री जयकुमार गोरे : ०८ वाहने (शासकीय ताफ्यासह)
- आमदार व पदाधिकारी : ३० वाहने
- विविध पक्षांचे कार्यकर्ते : ५० वाहने
- विभागप्रमुख व अधिकारी : २५ वाहने
- इतर वाहने : २५

एकूण वाहनांची संख्या १५० च्या पुढे गेल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन देशहितासाठी असल्याचे सांगितले. 'प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी इंधन बचतीसाठी पुढाकार घ्यावा. अधिकाऱ्यांनी कमीत कमी इंधन वापरावर भर द्यावा. देशहित डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे,' असे त्यांनी म्हटले.

दुसरीकडे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनीही इंधन बचतीसाठी प्रशासन स्वतंत्र परिपत्रक काढणार असल्याची माहिती दिली. 'सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक वाहनांचा वापर कमी करून एकाच वाहनातून प्रवास करावा. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. बैठका आणि दौऱ्यांमध्येही इंधन बचतीला प्राधान्य देण्यात येईल,' असे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र, प्रत्यक्षात सोलापुरातील सार्वजनिक प्रवासी व्यवस्थेची दयनीय अवस्था असल्याने नागरिकांकडूनही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरासाठी १०० ई-बसेस मंजूर झाल्याची घोषणा दीड वर्षापूर्वी करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात ४० बसेस येणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्यासाठी महापालिका आणि महावितरणकडून आवश्यक सुविधा उभारण्यात आल्याचा दावा करण्यात आला. मात्र, तांत्रिक कारणांमुळे अद्याप एकही नवी बस शहराच्या सेवेत दाखल झालेली नाही.

सध्या महापालिका परिवहनच्या केवळ २२ बसेस उपलब्ध असून त्यापैकी फक्त १८ बसेस प्रत्यक्ष मार्गावर धावत आहेत. शहरातील पाच आणि ग्रामीण भागातील तेरा मार्गावर या बसेस सेवा देत आहेत. दुसरीकडे शहरात तब्बल १५ हजार रिक्षा धावत असल्याने खासगी वाहनांवरील अवलंबित्व वाढले आहे.

एका बाजूला इंधन बचतीचे आवाहन, तर दुसऱ्या बाजूला सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची अपुरी क्षमता आणि मंत्र्यांच्या बैठकीत वाहनांची झालेली प्रचंड गर्दी यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'काटकसर जनतेसाठीच की सत्ताधाऱ्यांसाठीही?' असा सवाल आता सोलापूरकरांकडून उपस्थित केला जात आहे.

## शिक्षणाधिकाऱ्यावर शारीरिक मागणीचा महिला शिक्षिकेचा गंभीर आरोप

### बेकायदेशीर कामासाठी शिक्षिकेचा दबाव; शिक्षण अधिकाऱ्याची पोलिसात धाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी शारीरिक सुखाची मागणी केली. मी त्यांच्या सांगण्यावरून गेले नाही, त्यामुळेच माझा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला, असा गंभीर आरोप एका महिला शिक्षिकेने सोमवारी माध्यमांसमोर केला.

हा प्रकार जिल्हा परिषदेच्या आवारात पोलिसांच्या उपस्थितीत घडला.

शिक्षिकेने सांगितले की, फेब्रुवारी महिन्यात हे प्रकरण उघडकीस आणले होते. नियमित वेतनश्रेणी मान्यतेसाठी मला बोलावण्यात आले होते. मी कार्यालयात गेले होते. त्यावेळी माझी आई व कार्यालयातील कर्मचारीही उपस्थित होते. थकीत बिलाचा प्रस्ताव तयार करून तिथे येण्यास सांगितले होते. मात्र, मी तेथे गेले नाही. त्यानंतर माझे थकीत बिल प्रलंबित ठेवण्यात आले. प्रस्तावावर नकारात्मक नोंदी करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

त्या पुढे म्हणाल्या, "मी दाखल केलेल्या प्रस्तावावर मला लागू नसलेले नियम लावण्यात आले. त्यामुळे बिल प्रलंबित ठेवण्यात आले. त्यांनी बोलावल्यानंतर मी गेले नाही, हेच त्यामागील कारण आहे.



माझी चौकशीही लावण्यात आली. पुणे येथील कार्यालयातही पाठपुरावा केला; मात्र तेथूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. आता मी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात आले असता उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. पोलिसांना बोलावून मला ताब्यात देण्यात आले."

**सरकारी कामात अडथळा; महिला शिक्षिकेवर गुन्हा**

शिक्षणाधिकारी जगताप यांच्या तक्रारीवरून महिला शिक्षिका शीतल काळे यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती जेलरोड पोलिसांनी दिली.

**'तो प्रस्ताव देता येत नाही; मान्यताच बोगस'**

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचे उत्तर : "मी ज्या पदावर कार्यरत आहे, त्या पदाच्या मयार्दा पाळूनच बोलू शकतो. गेल्या दोन वर्षात मी कोणतेही चुकीचे काम केलेले नाही. संबंधित प्रकरणात मी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. यापूर्वीही हा विषय समोर आला होता. तक्रारीत तथ्य असते, तर आतापर्यंत माझ्यावर कारवाई झाली असती," असे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, "मला अज्ञात व्यक्तींकडून दोन वेळा जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. तरीही माझ्या कामकाजाच्या पद्धतीत बदल झालेला नाही. नियमांनुसारच काम करावे लागते. संबंधित प्रस्ताव मंजूर करता येत नाही. मुळात ती मान्यताच बोगस आहे. एमईपीएस नियम ३४.२ नुसार वेतन देता येत नाही."

## शेतकऱ्यांच्या सुपीक जमीनी उध्वस्त करून घरादारावर नांगर फिरवणारा शक्तीपीठ महामार्ग - आ.रोहित पवार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुका शक्तीपीठ महामार्ग विरोधी समितीच्या वतीने कडाडुन विरोध करण्यासाठी निमगाव (म) येथे आमदार रोहित पवार यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर होते.

पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की,शक्तीपीठ महामार्ग स्थानिक लोकप्रतिनिधींना व शेतकऱ्यांकडून विचारात न घेता शेतकऱ्यांवर सरकारने लादलेला महामार्ग असुन माळशिरस तालुक्यातील सुपीक व हामखास उपन्न देणाऱ्या बागायती भागातून जात असल्याने शेतकऱ्यांनी बंधावरची व रस्त्यावरील लढाई सर्वांनी एकत्र येऊन लढली पाहिजे.या शक्तीपीठ महामागार्साठी २०२३ साली ५७००० हजार कोटी रुपए खर्च होत होता. २०२६ ला १ लाख कोटी रुपए खर्च होतात एका किलोमीटर सहा पदरी महामार्ग साठी १२० कोटी खर्च होतात




हाच पैसे सरकारने सिंचनावर व शेतकऱ्यांच्या अंतर्गत रस्त्यावर खर्च करावेत असे आवाहन पवार यांनी केले

या कार्यक्रमासाठी कृषी भुषण राजेंद्र पवार,माळशिरस पंचायत समिचीचे सभापती दत्ता मगर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, शक्तीपीठ संघर्ष समितीचे कोल्हापूरचे फोंडे माजी जि.प. सदस्य सतीशराव माने-देशमुख स्वाभामानी शेतकरी संघटनेचे अजित बोरकर व माळशिरस तालुका शक्तीपीठ विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी निमगाव परिसरातील सर्व पक्षीय नेते मंडळी बहुसंख्य शेतकरी व महिला उपस्थित होत्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय मगर, डॉ. सचिन मगर, ॲड. जयसिंह मगर, मिनिनाथ मगर, महावीर मगर, बापु मगर यांनी परिश्रम घेतले.

निमगावकरांचे मगर कुटुंबीयांचे जवाई आ.रोहित पवार असुन आमदार जावयाने सासरवाडील लोकांची काळजी घेऊन पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे भावनिक आवाहन केले.

## स्वच्छता अधिभाराची वसुली; तरीही बसस्थानकात अस्वच्छताच



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य परिवहन महामंडळाने १५ एप्रिलपासून प्रवासी तिकिटावर दोन रुपये 'स्वच्छता अधिभार' लागू केला असला, तरी सोलापूर विभागातील अनेक बसस्थानके आणि एसटी बसमध्ये अद्यापही अस्वच्छतेचे चित्र कायम असल्याने प्रवाशांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्वच्छतेच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात असताना बसस्थानक परिसरात धूळ, कचरा आणि दुर्गंधीचे साम्राज्य असल्याने प्रवासी संतप्त झाले आहेत.

एसटी महामंडळाकडून प्रत्येक प्रवाशाच्या तिकिटावर दोन रुपये अतिरिक्त आकारले जात आहेत. या निधीतून बसस्थानके आणि बसमध्ये अधिक दर्जेदार स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अनेक बसस्थानकांमध्ये शौचालयांची दयनीय अवस्था असून दुर्गंधीमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

करावा लागत आहे. जागोजागी प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या आणि फळांच्या साली पडलेल्या दिसत आहेत. सोलापूर विभागातील नऊ आगारांमध्ये या अधिभाराची अंमलबजावणी सुरू झाली आहे. उन्हाळी हंगामातील दहा टक्के भाडेवाढ आणि त्यात स्वच्छता अधिभारामुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला आर्थिक फटका बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जिल्हाअंतर्गत तसेच लांब पल्ल्याच्या अनेक बसमध्येही साफसफाईचा अभाव दिसून येत आहे. बसमध्ये रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक आणि खाद्यपदार्थांचे कागद पडलेले आढळत असल्याने 'अधिभार घेतला जातोय; पण स्वच्छता कधी होणार?' असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

## NEET परीक्षा रद्द, पेपरफुटीच्या घटनेनंतर शासनाचा निर्णय

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** राज्यातील 10 वी आणि 12 वी परीक्षेचा (Exam) निकाल नुकताच जाहीर झाला असून 10 वी नंतर अनेकांनी नीट (NEET) परीक्षेची तयारी सुरू केली आहे. तर, 12 वीच्या (HSC) परीक्षेनंतर कित्ये विद्यार्थ्यांनी NEET परीक्षा देऊन भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते.

मात्र, केंद्र सरकारने नीट परीक्षेसंदर्भात मोठा निर्णय घेतला असून यंदाच्या वर्षी म्हणजेच 3 मे 2026 रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. आता, ही परीक्षा नव्याने घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे शासनाने हा निर्णय घेतला असून काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित केला होता.

देशातील सुमारे 22 लाख विद्यार्थ्यांनी यंदा 3 मे 2026 रोजी नीटची परीक्षा दिली होती, त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. मात्र, देशभरात 42 तास अगोदरच या पेपरची प्रश्नपत्रिका बाहेर आल्याने पेपर फुटला होता. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेकडून हा परीक्षा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**नीट पेपरफुटीवरुन राहुल गांधींचाही संताप**

काँग्रेस नेते राहुल गांधींनीही NEET 2026 च्या परीक्षेचा पेपर लीक झाल्याबद्दल ट्विट केलं होतं. ही आता परीक्षा राहिलेली नाही, NEET आता एक लिलाव बनला आहे. परीक्षेच्या तब्बल 42 तास आधीच अनेक प्रश्न WhatsApp वर विकले जात होते. 22 लाखांहून अधिक मुलांनी वर्षभर रात्रंदिवस जागून अभ्यास केला, आपल्या भविष्यासाठी झटले, आणि एका रात्रीत त्यांच्या भविष्यास खुलेआम बाजारात लिलावाला ठेवण्यात आले. ही पहिली वेळ नाही. गेल्या 10 वर्षांत 89 पेपर लीक झाले असून 48 वेळा पुन्हा परीक्षा घ्यावी लागली आहे. प्रत्येक वेळी तीच आश्वासने, आणि नंतर तीच शांतता, अशा शब्दात राहुल गांधींनी नीट पेपरफुटीवरुन संताप व्यक्त केला होता. मोदीजी, जेव्हा प्रत्येक अपयशाचे बिल तुम्ही जनतेच्या माथी मारता, तेव्हा त्या बिलामध्ये गरीबांच्या मुलांचे भविष्यही सामावलेले असते. 22 लाख विद्यार्थ्यांचा विश्वास तुटला आहे, भारताच्या तरुणांच्या स्वप्नांसाठी मोदी सरकारपेक्षा दुसरा मोठा धोका नाही. मी भारताच्या तरुणांसोबत उभा आहे. हा काळ अत्यंत कठीण आहे, मला याची जाणीव आहे. पण, ही व्यवस्था कायम अशी राहणार नाही. आपण सगळे मिळून ती बदलू, असेही राहुल गांधींनी म्हटलं होतं.

**रोहित पवार काय म्हणाले?**

281 प्रश्न असलेल्या ॅ४ी२२ स्रंस्री१ मधील 131 प्रश्न जसेच्या तसे NEET च्या प्रश्नपत्रिकेत येत असतील तर 2024 प्रमाणे यंदा देखील परीक्षेत पैशांचा मोठा खेळ झाला हे स्पष्ट आहे. गेल्या आठवड्यात महाराष्ट्रात देखील असाच प्रकार SRPF परीक्षेच्या संदर्भात देखील झाला होता. ठराविक दलालांच्या पैशाच्या खेळात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी करून त्यांच्या आयुष्याचा खेळ करणं योग्य नाही. तपास यंत्रणांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कठोर कारवाई करावी, ही विनंती, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते रोहित पवार म्हणाले.

**परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर**

पेपरीफुटीमुळे नीटची परीक्षा रद्द करण्यात आली असून सीबीआयमार्फत याप्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. देशभरात गेल्याच आठवड्यात म्हणजेच 3 मे 2026 रोजी नीटची परीक्षा घेण्यात आली होती. आता, नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, त्यासाठी परीक्षार्थींचे परीक्षा केंद्र 3 मे रोजीचेच राहणार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही, मात्र नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थी,पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भोंगळ कारभारामुळे विषारी धुराने परिसर गुदमरला

### नियम धाब्यावर बसवून मार्केट कमिटीकडून प्लास्टिक कचऱ्याची जाळपोळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा आणि पर्यावरणविरोधी कारभाराचा गंभीर प्रकार समोर आला आहे. मार्केट यार्डच्या पाठीमागील भिंतीलगत मोठ्या प्रमाणात संपूर्ण मार्केटमधील प्लास्टिक व कागदी कचरा टाकला जात असून, या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी तो सर्रास पेटवून दिला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

मार्केट कमिटीच्या कर्मचाऱ्यांकडूनच हा प्लास्टिक कचरा गोळा करून त्याला आग लावण्यात येत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात विषारी धूर पसरत आहे. या धुरामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यालाही मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे प्लास्टिक जाळणे हे कायद्याने गुन्हा असतानाही मार्केट कमिटीकडून उघडपणे नियमांची पायमल्ली केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.



दररोज हजारो नागरिक, व्यापारी, हमाल आणि शेतकरी ये-जा करत असलेल्या मार्केट यार्ड परिसरात अशा प्रकारे विषारी धूर निर्माण करून लोकांच्या जीवाशी खेळ केला जात आहे. प्लास्टिक जाळल्याने हवेत घातक रसायने मिसळून श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ आणि इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. मात्र याकडे मार्केट कमिटी प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

पर्यावरण संरक्षणाचे नियम पायदळी तुडवत सुरू असलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. 'सामान्य नागरिकांनी कचरा जाळला तर दंड आणि कारवाई केली जाते, मग मार्केट कमिटीला कायद्यापेक्षा वेगळे नियम आहेत का?' असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

या गंभीर प्रकाराची तात्काळ चौकशी करून प्लास्टिक कचरा जाळणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिक आणि पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. तसेच मार्केट यार्ड परिसरातील कचरा व्यवस्थापनाची स्वतंत्र चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणीही पुढे येत आहे.

## अक्कलकोटसह सोलापूर जिल्ह्यात २७८४ कोटींच्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचे १४ मे रोजी भूमिपूजन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूमिपूजन समारंभ गुरुवारी (ता.१४) सायंकाळी ५ वाजता अक्कलकोट येथील नवीन बसस्थानक परिसरात होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

या कार्यक्रमात एकूण १७१ कि.मी. लांबीच्या आणि तब्बल २७८४ कोटी रुपये खर्चाच्या विविध महामार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. यात हसापूर ते बडदाल राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १५०(सी) या मार्गाच्या ग्रीनफिल्ड अलाईनमेंट सहा पदरीकरणाचा १५५२ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प समाविष्ट आहे. तसेच वागदरी-अक्कलकोट-तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८(बी)चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण, मोहोळ-बसवनगर- वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चे पेव्हड शोल्डरसहित दुपदरीकरण, दुधनी येथील रेल्वे उड्डाण पूल, राष्ट्रीय महामार्ग १५० ई चे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण (प्रकल्प खर्च ९७ कोटी) तसेच राष्ट्रीय महामार्ग १५० ई वरील बोरी उमरगे येथील बोरी नदीवरील मोठ्या पुलाच्या बांधकामाचा (प्रकल्प खर्च २६ कोटी) आदींचा समावेश या प्रकल्पांमध्ये आहे.

कार्यक्रमास सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. याशिवाय कर्नाटक राज्य धोरण व नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष बी. आर. पाटील, खा. डॉ. ज्योती वाघमारे, खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खा. धैर्यशील मोहितेपाटील, बिदरचे खा. सागर खंड्रे, खा. प्रणिती शिंदे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, कर्नाटकचे पंचायतराज मंत्री प्रियांक खर्गे, आ. विजय देशमुख आदी उपस्थित राहणार आहेत.

## संपादकीय

# निवडणुका संपल्या, आता काटकसर?

कथित अण्वस्त्रसज्ज इराणला धडा शिकवण्यासाठी इस्रायलने अमेरिकेच्या पाठिंब्याने त्या देशावर हल्ला चढवला तो २८ फेब्रुवारी रोजी. तिकडे आखातात ती धुमश्चक्री सुरू असताना इकडे, आपल्याकडील पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुका पार पडून त्यांचा निकाल लागला तो गेल्या आठवड्यात, ४ मे रोजी. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखाती युद्धाच्या आपल्या देशाला सोसाव्या लागत असलेल्या झळांची तीव्रता कमी करण्यासाठी काटकसरीच्या विविध उपायांचे आवाहन केले ते परवा, १० मे रोजी. म्हणजे युद्धाला तोंड फुटून तीन महिने उलटून गेल्यानंतर पंतप्रधानांचे हे जाहीर आवाहन आलेले आहे.

खरे म्हणजे असे आवाहन पंतप्रधानांनी याआधीच करणे अपेक्षित होते; पण दरम्यानचा काळ पडला पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा. त्या काळात असे काही काटकसरीचे आव्हान करणे म्हणजे ह्यसरकार कुचकामी आहे; सगळे ओझे नागरिकांच्या खांद्यावर ठेवते आहे,ह्ण असा आरोप विरोधकांना करण्याची संधी देणे, असे सरकारला वाटले असावे. त्यामुळे, निवडणुका उरकू देत; मग आवाहन करू या, हा सरकारचा आणि अर्थातच भारतीय जनता पक्षाचा हिशेब असणारच. त्यास अनुसरून पंतप्रधानांचे हे आवाहन विलंबाने आलेले दिसते.

क्षीण होणारा भारतीय रुपया, कच्च्या तेलाचे आकाशाला भिडलेले भाव, इंधन टंचाईचे संकट, तेल कंपन्यांना रोज होत असलेला सुमारे १६०० ते १७०० कोटी रुपयांचा तोटा, सोनेआयातीसाठी खर्च करावे लागणारे डॉलर आदी मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांपुढील मर्यादित पर्यायांकडे बघता येईल. शक्य तेथे 'वर्क फ्रॉम होम' करा, वर्षभर सोनेखरेदी टाळा, वर्षभर परदेश प्रवास टाळा, इंधन वाचवा, खाद्यतेल कमी वापरा, परदेशी वस्तूखरेदी कमी करा, एक वर्ष परदेशात जाऊ नका, आयात खते वापरू नका... ही पंतप्रधानांच्या आवाहनांची गोळाबेरीज. या सगळ्याच्या मुळाशी आहे ते भारतातील परकी चलनाची गंगाजळी राखण्याचे उद्दिष्ट. युद्ध सुरू होण्याच्या सुमारास ही गंगाजळी ७२८ अब्ज डॉलर होती, ती युद्धाच्या झळांमुळे ६९०.६९ अब्ज डॉलरपर्यंत घसरलेली आहे.

आपल्या एकूण निर्यातीत कच्चे तेल, सोने, खाद्यतेल आणि परदेशी खते या चार घटकांच्या मिळून आयातीचे प्रमाण जवळपास ३१ टक्के इतके आहे. ही आयात घटल्यास देशाची परकी गंगाजळी चांगल्या प्रमाणात वाचू शकते, हे गणित पंतप्रधानांच्या आवाहनामागे आहे. त्याच वेळी, भारताची चालू खात्यातील तूट (सीएडी) ४८४.५ अब्ज डॉलरवर जाण्याचा इशारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेला आहे. या सगळ्या बाबी लक्षात घेता आणि आखातातील धुमश्चक्री थांबण्याबाबतची अनिश्चितता पाहता काही उपाय करणे आवश्यकच आहे, यात शंका नाही. प्रश्न असा आहे की, या अशा आवाहनांनी खरोखर काही साध्य होईल का? आणि निवडणुकांमुळे दीर्घ काळ रोखून धरलेली इंधनदरवाढ करण्यासाठीची ही नेपथ्यरचना तर नाही ना?

पंतप्रधान मोदी यांनी सध्याच्या काळाला 'संकटकाळ' असे संबोधलेले असले तरी त्यास सामोरे जाण्यासाठीच्या उपायांबाबत नियमांचे सूतोवाच अद्याप तरी केलेले नाही. आणि या अशा गोष्टी केवळ आवाहन करून होतील, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. हे संकटकालीन आव्हान स्वीकारायचे तर मुळात आधी आपल्यापुढ्यात समस्या आहेत, हे खुल्या मनाने कबूल करावे लागेल. ही अशी कबुली देण्यास सरकार आजवर चाचरत का होते ते नकळे. आणि महत्त्वाचे म्हणजे सोनेखरेदी, खाद्यतेल, इंधन वापर, खतांचा वापर या गोष्टी भारतीयांच्या भल्या-बुऱ्या मानसिकतेशी निगडित आहेत. कुणी आवाहन करून, सूचना करून त्या मानसिकतेत एकाएकी, एका रात्रीत बदल होणे खूपच कठीण. त्यामुळे हे आव्हान स्वीकारण्यासाठी ठोस पावलेच टाकावी लागतील. ती करताना विविध घटकांचा विचार करावा लागेल. मोदी यांच्या आवाहनानंतर दुसऱ्याच दिवशी, सोमवारी शेअर बाजारात काही कंपन्यांच्या शेअर्सना फटका बसला. आणि विचार फक्त शेअर बाजाराचा व्हायला नको; सोने, शेती, वाहतूक अशा उद्योगांतील शेवटच्या माणसाचा विचार करून नियम करावे लागतील. हे आव्हान मोदी सरकारने स्वीकारावे.

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत : सोमनाथची गाथा

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती— हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच 'सोमनाथ— चंद्राचा अधिपती' हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी—लाकूड आणि गवताची— असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या-१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०-५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तींच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे—सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा. तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले. पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे. त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोतुर्गीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२-८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन 'भक्ती आणि लज्जा' असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२-१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केलेः 'या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.' जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला 'हिंदू पुनरुत्थानवाद' म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे. त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण—मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना 'ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू' हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे—पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो—
'आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.'

**- ब्रिजेश सिंह,**
प्रधान सचिव तथा महासंचालक,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपातून नवरा व जावेची निर्दोष मुक्तता- ॲड. धनंजय माने

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पत्नी राणी तानाजी चव्हाण हिचा मोटारसायकल विकत घेण्यासाठी व घर बांधण्यासाठी माहेरहुन पैसे आणण्यासाठी तिला त्रास दिला व तिला आत्महत्येस प्रवृत्त केले या आरोपावरुन तिचा पती तानाजी जनार्धन चव्हाण व जाउ रमाबाई शिवाजी चव्हाण दोघे रा. बैरागवाडी ता. मोहोळ यांचेविरुध्द भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायालयात होऊन न्यायाधिशांनी सबळ पुराव्याअभावी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

रमेश तानाजी साळुंखे रा. वाफळे ता. मोहोळ याने दि. ०१ जुलै २०२० रोजी मोहोळ पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत त्याची बहिण राणी हिचे लग्न आरोपी तानाजी चव्हाण याचेबरोबर सन २०१८ साली झाल्यानंतर नवऱ्याने व जावेने मोटारसायकलसाठी व घर बांधणीसाठी माहेरवरुन पैसे आणण्यासाठी त्याच्या बहिणीला त्रास दिला व त्यामुळे त्याच्या बहिणीने दि. २९ जुन २०२० रोजी विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली असा आरोप केला होता.

मयत राणी ही विहीरीवर कपडे धुण्यास गेली असताना पाय घसरुन विहीरीत पडली व तिचा अपघाती मृत्यु झाला असे आरोपीपक्षाचे म्हणणे होते. मोहोळ पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या प्रथम खबरीमध्ये राणीचा अपघाती मृत्यु झाला असे नमुद करण्यात आले होते.

या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. श्रीहरी कुरापाटी, ॲड. किरण गवळी यांनी काम पाहिले.

# श्रीराम प्रतिष्ठानच्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात २५ जोडपी विवाहबंधनात

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा शहरात श्रीराम प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा यंदाही अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या थाटामाटात संपन्न झाला, या भव्य विवाह सोहळ्यात तब्बल २५ जोडपी विवाहबंधनात अडकली असून संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला होता.

सालाबादप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या विवाह सोहळ्याने करमाळा तालुक्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. सर्वधर्मीय समाजाला एकत्र आणत सामाजिक समतेचा संदेश देणारा हा सोहळा हजारो नागरिकांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला.

या भव्य विवाह सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे, माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, बार्शीचे माजी आमदार राजाभाऊ राऊत, आमदार नारायण आबा पाटील, माजी आमदार संयमामा शिंदे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहाजीभाऊ पवार, अविनाश महागावकर, चेतनसिंह केदार, रश्मीदीदी बागल यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नववधू-वरांना शुभाशीर्वाद देत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी श्रीराम प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे सांगितले. पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांनीही सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य कुटुंबांना दिलासा देणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे नमूद करत गणेश चिवटे यांचे कौतुक केले,

माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी प्रत्येक वर्षीप्रमाणे याही वर्षी विवाह सोहळ्यास उपस्थित राहत नवदाम्पत्यांना आशीर्वाद दिले. त्यांनी श्रीराम प्रतिष्ठानच्या माध्यमातून होत असलेल्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांना आपला कायम पाठिंबा राहील असे सांगितले.

विवाह सोहळ्यादरम्यान संपूर्ण परिसरात आनंद, उत्साह आणि आपुलकीचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी तालुक्यातील नागरिकांनी व वऱ्हाडी मंडळी आणि विविध समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते,

गरजू कुटुंबांच्या आयुष्यात आनंद निर्माण करत समाजातील ऐक्य अधिक दृढ करणारा श्रीराम प्रतिष्ठानचा हा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा करमाळा तालुक्यात सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला आहे.







श्रीराम प्रतिष्ठान आयोजित सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे हे चौथे वर्ष होते, आजपर्यंत प्रतिष्ठानच्या वतीने ७९ विवाह लावण्यात आले होते या वर्षी प्रतिष्ठानने १०० री पार करत १०५ विवाह यशस्वी संपन्न केले आहेत, याचे सर्व नियोजन हे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येते, व प्रत्येक स्वयंसेवक हे प्रामाणिकपणे काम करतात.

या विवाह सोहळ्यामध्ये प्रत्येक वधू वरांना सर्व संसार उपयोगी साहित्य दिले जाते, यामध्ये मनी मंगळसूत्र, जोडवे, बिचवे, हळदीची व लग्नाची संपूर्ण कपडे, बुट-चप्पल, सर्व नवरदेवांना मिरवणुकीसाठी स्वतंत्र घोडा व बँज्यो, मेकअप करण्यासाठी स्वतंत्र टिम, सर्व व्हराडी मंडळींना जेवन, सर्वांना मानाची शिदोरी, प्रशस्त मंडप, स्पिकर, लाईट डेकोरेशन अशा सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आली

# कामगारांना सक्तीची सेवानिवृत्ती देणाऱ्या कंपनी व्यवस्थापनावर कारवाई करा - कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** नाशिक येथील बजाज इलेक्ट्रिक कंपनीतील ४१ कायमस्वरूपी कामगारांना व्यवस्थापनाने कोणतीही पूर्वकल्पना न देता आणि नियमबाह्य पद्धतीने सक्तीची सेवानिवृत्ती घेण्यास भाग पाडल्याची गंभीर दखल शासनाने घेतली आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात कामगार हितासाठी कंपनी व्यवस्थापनावर कामगार कायदे व नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या कोणत्याही कंपनीची गय केली जाणार नाही, असा इशाराही कामगार मंत्र्यांनी दिला. बैठकीस आमदार सीमा हिरे, कामगार आयुक्त एच पी तुम्मोड, उपसचिव स्वप्नील कापडणीस आणि कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री ॲड आकाश फुंडकर म्हणाले, बजाज इलेक्ट्रिक कंपनीत अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या ४१६ कायम कामगारांना व्यवस्थापनाने सक्तीने सेवानिवृत्त केले. व्यवस्थापनाच्या या एकतर्फी निर्णयामुळे ४१ कुटुंबांचा उदरनिवार्हाचा प्रश्न निर्माण झाला आहे. कामगारांचे हित जोपासणे हे राज्य शासनाचे कर्तव्य असून अशा सक्तीच्या निर्णयांना कायदेशीर आधार नाही. यंत्रणेने संबंधित कंपनी व्यवस्थापनावर कामगार कायदे आणि नियमांनुसार कारवाई करावी. यामध्ये कामगारांच्या अतिकलित भत्ता, वेतन आदींची वसुली करणे समाविष्ट असेल.

महाराष्ट्र हे उद्योगांना चालना देणारे राज्य असले तरी, उद्योगांनी कामगारांच्या श्रमाचा आदर करणे तितकेच आवश्यक आहे. सक्तीची सेवानिवृत्ती लादणे हे अनैतिक आहे. या ४१ कामगारांना न्याय मिळेपर्यंत कामगार विभाग पाठपुरावा करेल आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेस पक्षाचे माजी खा. गंगाधर सिद्रामप्पा कुचन यांचे निधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेस पक्षाचे माजी खासदार गंगाधरपंत सिद्रामप्पा कुचन यांचे मंगळवार, दि. १२ मे रोजी पहाटे पाच वाजता दुःखद निधन झाले. ते गेल्या दहा दिवसांपासून आजारी होते. शहरातील अश्विनी हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते.

गंगाधरपंत कुचन यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात विविध सामाजिक प्रश्नांवर काम करत जनतेशी कायम जवळीक



ठेवली होती.

त्यांच्या पश्चात दोन मुली, तीन मुले, नातू-नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# शेतकऱ्यांना भूसंपादनाचे पैसे तातडीने द्यावे : मंत्री संजय राठोड

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** जलसंधारण महामंडळ आणि शासन अंतर्गत प्रकल्पांच्या बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचे पैसे तातडीने देण्याच्या सूचना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिल्या.

मंत्रालयात आयोजित राधानगरी विधानसभा मतदारसंघातील जलसंधारण विभागाच्या विविध प्रलंबित आणि प्रगतीपथावरील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



राधानगरी, भुदरगड आणि आजरा तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने गतीने कार्यवाही करावी, अशा सूचना मंत्री संजय राठोड यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जलसंधारण कामांमुळे भविष्यात शेतीसाठी पाणी उपलब्धता वाढून परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

बैठकीत राधानगरी तालुक्यातील लघु पाटबंधारे तलाव पाल, बनाचीवाडी, साठवण तलाव आपटाळ आणि कुक्कडवाडी या योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच भुदरगड तालुक्यातील वासनोली, कारिवडे, चिवाळे, आप्पाचीवाडी, पडखंबे येथील लघु पाटबंधारे तलाव, मठगाव पाझर तलाव आणि पंडिवरे साठवण तलाव यांचाही आढावा घेण्यात आला. आजरा तालुक्यातील पेरनोली आणि देवकांडगाव साठवण तलाव योजनांच्या कामांच्या प्रगतीवरही चर्चा करण्यात आली.

## वात्रटिका

### नवी नाही पेपरफुटी

पेपरफुटीचे केंद्र होते ते,
तिथेच घडले कारस्थान...
मोठाच खळबळा घडला
ते राज्य आहे राजस्थान...
परीक्षा कोणतीही असो
घडते असे की..येतो वीट...
सोपा गेला पेपर तरी,कर
अभ्यास पुन्हा आणि दे नीट...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीत ४ हजार ४३२ प्रकरणे निकाली

## ५५ कोटींहून अधिक रकमेची तडजोड; अनेक वर्षांपासून प्रलंबित व अपघातग्रस्त प्रकरणांनाही दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यात शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज राणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये ही लोकअदालत यशस्वीपणे पार पडली.

या लोकअदालतीमध्ये एकूण ३५ हजार ८२० प्रलंबित प्रकरणे तसेच २२ हजार २३७ दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी तब्बल ४ हजार ४३२ प्रकरणांमध्ये सामोपचाराने तडजोड करण्यात आली. या तडजोडीतून एकूण ५५ कोटी ५२ लाख ८० हजार ५०८ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून देण्यात आली.

लोकअदालतीमध्ये विविध बँका, वित्तीय संस्था, बीएसएनएल, महावितरण, विमा कंपन्या, पतसंस्था, वाहतूक विभाग तसेच विविध पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला. नागरिकांनीही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यास प्राधान्य दिले.

### विशेष मोहिमेत २,१२८ प्रकरणे निकाली

राष्ट्रीय लोकअदालतीपूर्वी दि. ४ मे ते ८ मे २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान एकूण २ हजार १२८ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### प्रकरणांचा तपशील :

**प्रलंबित प्रकरणे**

- एकूण ठेवलेली प्रकरणे – ३५,८२०
- तडजोड झालेली प्रकरणे – १९८
- तडजोड रक्कम – ४८,२२,७६,०४३ रुपये

**दाखलपूर्व प्रकरणे**

- एकूण दाखलपूर्व प्रकरणे – २२,२३७



- तडजोड झालेली प्रकरणे – ३,४५४
- तडजोड रक्कम – ७,३०,६३,७६५ रुपये

याशिवाय दोन वैवाहिक प्रकरणेदेखील सामोपचाराने निकाली काढण्यात आली.

लोकअदालतीची यशोगाथा ठरलेली दोन महत्त्वाची प्रकरणे

राष्ट्रीय लोकअदालतीत काही संवेदनशील आणि अनेक वर्षे प्रलंबित असलेली प्रकरणेही सामोपचाराने निकाली निघाली. त्यामध्ये रस्ता अपघातातील नुकसानभरपाई आणि दीर्घकाळ चाललेल्या दिवाणी वादाचा समावेश आहे.

### अपघातग्रस्त कुटुंबाला १९ लाखांची मदत

रस्ता अपघातात कुटुंबातील कर्ता पुरुष गमावलेल्या एका कुटुंबावर मोठे संकट ओढवले होते. या प्रकरणात राष्ट्रीय लोकअदालतीत पॅनल प्रमुख तथा जिल्हा न्यायाधीश दीपा कुलकर्णी-रेड्डी व पॅनल सदस्य अ‍ॅड. एस. एम. पठाण यांनी मध्यस्थी करत तडजोड घडवून आणली. तडजोडीनंतर संबंधित विमा कंपनीकडून १९ लाख रुपयांच्या नुकसानभरपाईचा धनादेश मृत व्यक्तीच्या आई, पत्नी आणि दोन मुलींना प्रदान करण्यात आला. या प्रकरणात अ‍ॅड. एस. एम. पाटील तसेच विमा कंपनीतर्फे अ‍ॅड. ए. बी. पाटील यांनी काम पाहिले.

५२ वर्षांपासून प्रलंबित दिवाणी वाद मिटला.

दुसऱ्या एका प्रकरणात तब्बल ५२ वर्षांपासून सुरू असलेला दिवाणी वाद लोकअदालतीत मिटवण्यात यश आले. खरेदीखतावरील सही बनावट असल्याचा आरोप करत दाखल करण्यात आलेल्या या प्रकरणात दोन्ही पक्षांमध्ये अखेर सामोपचाराने तोडगा काढण्यात आला. पॅनल प्रमुख व पॅनल सदस्यांनी मध्यस्थी करत हा वाद निकाली काढला. या प्रकरणात अ‍ॅड. योगेश शरण व अ‍ॅड. आर. बी. पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मुजील एम. शेख, पॅनल वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच सर्व संबंधित विभागांनी विशेष परिश्रम घेतले. कमी खर्चात, जलद आणि सुलभ न्याय देण्याच्या दृष्टीने लोकअदालत प्रभावी माध्यम ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# शिवसेनेचे महापालिकेपुढे पाण्यावरून मटका फोडो आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील विस्कळीत पाणीपुरवठ्याने त्रस्त जनतेच्या भावना व्यवस्थेसमोर मांडण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी महापालिकासमोर सोमवारी (दि. 11) मटका फोडो आंदोलन केले.

शहरात ऐन उन्हाळ्यात सध्या अनेक भागात सात दिवसांतून एकदा पाणी येत आहे. यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे मटका फोडो आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. येत्या काही दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास पुन्हा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

महापालिका नागरिकांकडून वर्षाची पाणीपट्टी वसुली करते. मात्र, आठवड्यातून फक्त एकदाच पाणी देते. ते पाणीही अशुद्ध असल्याने शहरातील नागरिकांच्या पोटाचे आजार वाढले आहेत. त्यामुळे महापालिकेने दोन ते तीन दिवसाआड व शुद्ध पाणी द्यावे, अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली. यावेळी जिल्हाप्रमुख शरणराज केंगनाळकर, महेश धाराशिवकर, दत्ता माने, महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रिया बसवंती, मंगल थोरात, सायरा मुलाणी उपस्थित होत्या.



### सत्ता आल्यास दिवसाआड पाणी देणार होते

महापालिकेवर भाजपची सत्ता आल्यास एकदिवसाआड पाणी देण्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले होते. आता सत्ता येऊनही आठ दिवसाआड पाणी येत आहे. खोटे आश्वासनाने पालकमंत्र्यांनी नागरिकांची मते घेतली. निवडून आलेल्या 87 पैकी 62 नगरसेवक गद्दार असून, इतर नगरसेवकांचे काहीही चालत नसल्याचा आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांनी केला.

# अनधिकृत बाईक टॅक्सी अ‍ॅप्सवर कारवाई करा- प्रताप सरनाईक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी अ‍ॅप सेवा तत्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे.

मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध अ‍ॅप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.



या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या अ‍ॅप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे.

सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी अ‍ॅप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित अ‍ॅप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

# वैष्णवी शिंपी हिने पटकावला ‘कॅलिस्टा इंडिया २०२६’ मानाचा मुकुट



**पुणे, पिंपरी (कटूसत्य वृत्त):-** आपल्या उपजत सौंदर्याबरोबरच परीक्षकांनी विचारलेल्या मार्मिक, तिरकस प्रश्नांना प्रचंड आत्मविश्वासाने उत्तर देऊन आपले व्यक्तिमत्व आणि बौद्धिकता सिद्ध करत जळगाव येथील वैष्णवी शिंपी हिने टाळ्यांच्या कडकडाटात आणि रंगीबेरंगी प्रकाश झोतात ‘कॅलिस्टा इंडिया २०२६’ या बहुचर्चित सौंदर्य स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा आकर्षक मानाचा मुकुट आणि रोख २० हजार रुपयांचे बक्षीस पटकावले.

कॅलिस्टा पेजंट्स आयोजित ‘कॅलिस्टा इंडिया २०२६’ आणि ‘कॅलिस्टा मिस, मिसेस महाराष्ट्र २०२६’ या सौंदर्यस्पर्धेत अंतिम फेरीत विजेत्या ठरलेल्या सौंदर्यवतींना मुकुट, रोख बक्षीस, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. चिंचवड येथील एल्प्रो सिटी मॉल येथे आयोजित केलेल्या या अंतिम फेरीस कॅलिस्टा पेजंट्सचे कार्यकारी संचालक संजीव जोग, आधार पशुपक्षी मित्र फाउंडेशन व हमारा विश्व फाउंडेशनच्या संचालिका अनिता अग्रवाल, मायफिल्म प्रॉडक्शनचे मयूर सोनवणे, करिश्मा सुर्ती, स्पर्धेचे परीक्षक दीपाली मुंधारे, ज्योती कामत, सोनल परब, डॉ. भवानी, रुबिना चव्हाण, रोशिता रोज, स्वरा खरोटे, इरा खान, सानिया खान, अनामिका राणी आणि अनिता गनवीर तसेच देशभरातून सहभागी झालेल्या आणि अंतिम फेरीत स्थान मिळवलेल्या ३३ सौंदर्यवती उपस्थित होत्या.

प्रथम उपविजेतेपद पश्चिम बंगाल मधील काजल सोनकर हिला मुकुट, रोख १७ हजार रुपयांचे पारितोषिक, तर द्वितीय उपविजेतेपद विभागून जागृती गाणवे (रायगड) आणि वृषाली अजोटीकर (पुणे) यांना मुकुट आणि रोख १५ हजार रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

ऑनलाईन कॅलिस्टा इंडिया २०२६ विजेत्या म्हणून डॉ. स्नेहल नारखेडे पोल, प्रियांका झाडे आणि अनिता महापुरे यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच ऑनलाईन कॅलिस्टा महाराष्ट्र २०२६ विजेत्या अंजना गावले आणि डॉ. सुषमा सोनवणे यांनाही गौरविण्यात आले. शुभांगी मंगरुळकर, पूजा बनोडकर आणि प्राची राय यांना उत्तेजनार्थ विशेष गौरवचिन्ह, मुकुट आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला आयोजकांच्या वतीने सोनेरी नथ, पैठणी साडी, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धकांच्या वेशभूषेसाठी विशाखा लोहार (श्रीवस्त्रम), पूनम होंकळसे आणि ओंकार पवार (ओपी फॅशन डिझायनर, कराड) तर सौंदर्य खुलविण्यासाठी प्रियांका चौधरी (श्रृंगार मेकओव्हर, तळेगाव दाभाडे) यांनी मेकअप पार्टनर म्हणून सहकार्य केले. अंतिम फेरीत ग्लॅमर आणि फॅशन विश्वाला समर्पित विशेष स्मरणिकेचे प्रकाशन करिश्मा सुर्ती यांच्या हस्ते करण्यात आले. सारिका आणि प्रतिभा डोलणारे, नितीन साळुंखे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

**अधिक माहिती साठी :-**
कॅलिस्टा पेजंट्स कार्यकारी संचालक
संजीव जोग, +91 89997 38611

# पाझर पाईप निचरा प्रणलीचा वापर करावा - देवा फलफले

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** अति पाणी व बेसुमार रासायनिक खतामुळे जमिनी क्षारपड झाली असून शेती नापीक झाली आहे. यामुळे उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. यासाठी शेतकऱ्यांनी पाझर पाईप निचरा प्रणलीचा वापर करुन शेतीमध्ये उत्पादन वाढवावे असे आवाहन देवा फलफले यांनी यावेळी केले.



टाकळी ता.करमाळा या ठिकाणी बॅंक ऑफ महाराष्ट्र ग्रामीण विकास केंद्र भिगवण यांच्या तर्फे शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणुन देवा फलफले हे बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र बॅंकेचे उमेश निकम, माती परीक्षणचे पोपट लकडे, चेअरमन लतिश लकडे पाटील, सोमनाथ गुळवे, सोमनाथ तावरे, बापु जाधव आदिसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टाकळी परिसरातील व गावातील शेतकऱ्याची शेती मोठ्या प्रमाणात नापीक झाली आहे. हे थांबवणे आपल्याला शक्य आहे यासाठी उघड्या डोळ्याने फक्त न पाहता उपाययोजना मार्गदर्शनाखाली करणे गरजेचे आहे असे मत देवा फलफले यांनी व्यक्त केले. यावेळी पोपट लकडे यांनी माती परीक्षण यावर महिती दिली तर उमेश निकम यांनी बॅंक ऑफ महाराष्ट्र व ग्रामीण विकास केंद्र यांचा विविध योजनेची महिती दिली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अकुंश कोकाटे यांनी केले तर आभार सोमनाथ कुचेकर यांनी मानले.कार्यक्रमास गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# होटगी रोडवरील मिळकतधारकांना न्यायालयाचा दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी रोडवरील हॉटेल किनारा आणि लगतच्या मिळकतधारकांना सोलापूर न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. २४ मीटर रस्त्याच्या रेखांकनाचे कारण देत महापालिकेने बजावलेल्या नोटिसा बेकायदेशीर ठरवत, न्यायालयाने महापालिकेला या मिळकतींवर कोणतीही कारवाई करण्यास निरंतर मनाई केली आहे.

### नेमके प्रकरण काय ?

सोलापूर महानगरपालिकेने २३ जुलै २०१८ आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी होटगी रोडवरील मिळकतधारकांना नोटिसा बजावल्या होत्या. या नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले होते की, २४ मीटर रस्त्याचे रेखांकन मंजूर झाले असून, मिळकतधारकांनी त्यांच्या कंपाउंडचे बांधकाम स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा, महापालिका हे बांधकाम पाडून टाकेल, असा इशारा देण्यात आला होता. या कारवाईविरुद्ध मिळकतधारकांनी सोलापूर न्यायालयात धाव घेऊन महापालिकेविरुद्ध दावा दाखल केला होता.

### न्यायालयात झालेला युक्तिवाद

मिळकतधारकांतर्फे अ‍ॅड. यशोधन कणबसकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, महापालिकेने ज्या रेखांकनाचा आधार घेतला आहे, ते १९७६ सालचे असून त्यावेळी या मिळकती महापालिका हद्दीत नव्हत्या, त्यामुळे हे रेखांकन लागू होत नाही.नोटीस देण्यापूर्वी महापालिकेने कोणतीही अधिकृत मोजणी केलेली नाही. महापालिकेला रस्ता रुंदीकरणासाठी जागा हवी असल्यास त्यांनी रीतसर भूसंपादनाची कारवाई करणे आवश्यक आहे. युक्तिवादाच्या समर्थनार्थ अ‍ॅड. कणबसकर यांनी उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे विविध निवाडेही सादर केले.

### न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

दोन्ही बाजूंचा विचार केल्यानंतर न्यायालयाने स्पष्ट केले की, मिळकतधारकांनी मंजूर नकाशाव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त बांधकाम केल्याचे सिद्ध होत नाही. तसेच, महापालिकेने कोणत्या आधारावर ही कारवाई सुरू केली, याचा कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. यामुळे महापालिकेने दिलेल्या नोटिसा बेकायदेशीर ठरवून त्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच, या नोटिसांच्या आधारे कोणतीही कारवाई करू नये, असा आदेश देत न्यायालयाने वादींचा दावा मंजूर केला.

### मिळकतधारकांतर्फे कायदेशीर चमू

या प्रकरणात मिळकत धारकांतर्फे कै. अ‍ॅड. रमेश कणबसकर, अ‍ॅड. यशोधन कणबसकर, अ‍ॅड. रमा कणबसकर, अ‍ॅड. मृणाल कुबेर आणि अ‍ॅड. अभिषेक घोडके यांनी काम पाहिले. शहरात चर्चेचा विषय ठरलेल्या या निकालामुळे होटगी रोड परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.


## जाहिर प्रसिध्दीकरण

अर्ज क्र.२०२/२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब,यांचे कोर्टात**

किरण विजय कसबे,वय-२४ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.अनगर, ता.मोहोळ,जि.सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

मा.मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब नगरपंचायत अनगर, ता.मोहोळ, जि.सोलापूर.(अर्जाची नोटीस मुख्यकार्यकारी अधिकारीअनगर, ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी). } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार किरण विजय कसबे याचा जन्म ता. १५/०६/२००२ रोजी अर्जदार यांची आई रेखा विजय कसबे हिचे पोटी मौजे अनगर, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या जन्म दाखल्याची ता.७/४/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील जुन २००२ चे अभिलेखात अर्जदार यांचा किरण विजय कसबे याचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.२९/५/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ११/५/२०२६

लिपीक (शिक्का) सही/- तहसिलदार,मोहोळ.



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय

निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) लगेच उत्तर देणारा, वेळ न दवडता उत्तर देणारा २) धनी ३) सन उलट लिहा ४) सर्कशीतील विदूषक, पत्त्यातील एक पान ५) अंगावरील छोटा काळा ठिपका ६) पावा, मुरली ७) दुर्ग, किल्ला ८) महाराष्ट्रातील एक देशपातळीवरील नेते १२) लोकांचा समूह १३) हाताच्या चपळतेने फसविणे, ***** करणे १५) मोठे, उज्वल असे यश १६) एक रास २३) कमा उलट लिहा २५) राज्याचे माजी मुख्यमंत्री, सध्या केंद्रीय मंत्री- **** राणे २६) टीव्ही सिरीयल निर्माती-*** कपूर २७) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे २८) बे दुणे ३१) साईबाबांचा एक संदेश-*** मालिक एक ३२) लाकडाचे गोदाम ३३) मावशीचा मुलगा ३४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ३५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ३७) तल्लीन, मग्न होणे ३९) जंगल, अरण्य ४३) एकाग्र, मग्न होणे ४४) एक अभिनेते-*** दामले ४६) फळातील गोड द्रव ४८) सूर्य (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) श्रीरामाचा परमभक्त, वायुपुत्र ४) कोल्हापूर जिल्ह्यातील एक प्रसिध्द दैवत ७) श्री गजाननाचे एक नाव ९) लहान बाळाला ही टोचतात १०) मंदिराच्या शिखरावर हा बसवितात ११) परीट, धोबी १३) पराजय, जीतच्या विरूध्दार्थी १५) रांग १६) दम उलट लिहा १७) खर्चच्या विरूध्दार्थी १८) चार आणि तीन मिळून होणारी संख्या १९) आमीर खान अभिनीत एक चित्रपट-* इडियटस् २०) विश्वचषक (इंग्रजीत) २१) चाळीस आणि बारा मिळून होणारी संख्या २२) एक पेय, टी (मराठीत) २३) एक मराठी महिना २४) याच्यापासून शिरा बनवितात २५) गटर २६) सात गुणिले तीन २९) रक्षाबंधनवेळी बहीण भावाला बांधते ती ३०) एक जंगली हिंस्त्र पशु ३२) लग्नातील नवऱ्या मुलाची आई ३४) रांग, लाईन (हिंदीत) ३६) या कंपनीचे च्यवनप्राश प्रसिध्द आहे ३८) उन्हातान्हात भटकणे, **** फिरणे ४०) एक म्हण- दाम करी ** ४१) श्रीमंत (हिंदीत), शाहरूखचा एक हिंदी चित्रपट ४२) बनावट ४४) रयत, जनता, एक म्हण- जसा राजा तशी ** ४५) बोझा, वजन ४७) एक (इंग्रजीत) ४८) उत्सवाचा दिवस ४९) पर्जन्य ५०) निवडणुकीत उमेदवाराला मत देणे

## सुडोकु - 248

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | | | 7 | | | |
| | 5 | 1 | | 9 | 4 | 7 | 2 | |
| 4 | | 3 | | | | 8 | | |
| 6 | 8 | | | 2 | 3 | 4 | 7 | |
| | 3 | 4 | 5 | | | 1 | 6 | |
| 2 | 1 | | | | 6 | 5 | | |
| | | | 4 | | 2 | | 1 | |
| | 4 | 2 | | 5 | | 6 | | |
| 1 | 9 | 7 | | | | 2 | 5 | |

# खा. प्रणिती शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे तिऱ्हे येथे ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्रासाठी जागा मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला वीज प्रश्न आता मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तिऱ्हे येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) नियोजित ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्रासाठी हिरज येथील गायरान जागा मंजूर करण्यात आली आहे.

याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून महावितरण, सोलापूर यांना देण्यात आले असून, लवकरच उपकेंद्र उभारणीच्या कामास सुरुवात होणार आहे.

तिऱ्हे, हिरज, शिवणी, पाथरी, बेलाटी, तेलगाव आदी परिसरातील गावांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे, लोडशेडिंग आणि शहरावरील वाढत्या वीज भाराचा परिणाम ग्रामीण भागावर होणे अशा समस्या दीर्घकाळापासून निर्माण होत होत्या. या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे नवीन वीज उपकेंद्र उभारणीची मागणी केली होती.

त्यानंतर हिरज गाव भेटीदरम्यान ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू केला. महावितरणकडून ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी निधी मंजूर असतानाही शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे हे काम



अनेक वर्षांपासून रखडले होते.

खासदार प्रणिती शिंदे यांनी मा. जिल्हाधिकारी व संबंधित विभागाकडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता हिरज येथील गायरान जागा मंजूर करण्यात आल्याने उपकेंद्र उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

या नवीन वीज उपकेंद्रामुळे परिसरातील आठ ते दहा गावांना अधिक सुरळीत आणि स्थिर वीजपुरवठा मिळणार आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक वीज उपलब्ध होण्यास मदत होणार असून पिण्याच्या पाण्याच्या योजनांनाही याचा फायदा होणार आहे. तसेच उद्योग व दैनंदिन कामकाजासाठीही या उपकेंद्राचा मोठा लाभ होणार असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून प्रलंबित असलेला तिऱ्हे परिसरातील वीज प्रश्न आता सुटण्याच्या मार्गावर आल्याने ग्रामस्थ, शेतकरी आणि नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत असून खासदार प्रणिती शिंदे यांचे आभार मानले जात आहेत.

# सोलापूर जिल्हा परिषदेत 'नो व्हेईकल डे' उपक्रमाची अंमलबजावणी

**दर सोमवारी खासगी व शासकीय वाहनांना ब्रेक; पर्यावरण संवर्धनासाठी जिल्हा परिषदेचा अभिनव निर्णय**

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** वाढते वायू प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि इंधनाच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत व पर्यावरण संवर्धनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हा परिषद सोलापूरकडून प्रत्येक सोमवार हा दिवस 'नो व्हेईकल डे' म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील अधिकृत आदेश १२ मे २०२६ रोजी जारी करण्यात आले.

या निर्णयानुसार जिल्हा परिषदेमधील सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रत्येक सोमवारी कार्यालयात येताना खासगी दुचाकी किंवा चारचाकी वाहनांचा वापर टाळायचा आहे. तसेच शक्यतो शासकीय वाहनांचाही वापर न करण्याच्या



सूचना देण्यात आल्या आहेत. याऐवजी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, बससेवा, सायकल, इलेक्ट्रिक वाहन अथवा पायी प्रवास करण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने जारी केलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, पेट्रोल, डिझेल आणि इतर इंधनांचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. वाहनांमधून होणारे प्रदूषण कमी करणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे हा उपक्रम केवळ औपचारिकता न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. जिल्हा परिषद कार्यालय परिसरात सोमवारी वाहनांची संख्या कमी करण्यासाठी जनजागृतीही करण्यात येणार आहे. कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच इंधन बचतीचा संदेश समाजात पोहोचवण्याचाही या मोहिमेमागचा उद्देश आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी शासकीय यंत्रणेकडून उचलण्यात आलेल्या या पावलाचे विविध स्तरातून स्वागत होत आहे. वाढत्या प्रदूषणाच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम प्रभावी ठरू शकतात, अशी प्रतिक्रिया पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

या आदेशावर जिल्हा परिषद सोलापूरचे अध्यक्ष दीपक वैद्य तसेच उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्या स्वाक्षऱ्या असून सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'चला आपण सर्व मिळून देशहितासाठी छोटेसे योगदान देऊया,' असा प्रेरणादायी संदेशही पत्रकाच्या शेवटी देण्यात आला आहे.

# सोलापुरात २ कोटींच्या मुद्देमालासह ९५० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर गुन्हे शाखेने अमली पदार्थ विरोधात मोठी धडक कारवाई करत तब्बल १ कोटी ९० लाख रुपये किमतीचे ९५० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ जप्त केले आहेत. यासोबतच १० लाख रुपये किमतीची हुंडाई क्रेटा कार जप्त करण्यात आली असून एकूण २ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून एका महिलेसह आणखी एका आरोपीचा शोध सुरू आहे.

पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) गोहर हसन तसेच पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेने ही कारवाई केली.

गोपनीय माहितीवरून कारवाई दि. १२ मे २०२६ रोजी सकाळी शहर गुन्हे शाखेचे सहाय्यक



पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांचे पथक सोलापूर शहरात पेट्रोलिंग करत होते. यावेळी पोलीस अंमलदार भारत पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, मुस्लिम कब्रस्तान ते संगमेश्वर कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभ्या असलेल्या एका हुंडाई क्रेटा कारमध्ये अमली पदाथार्चा साठा आहे.

माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत संशयित वाहनाला घेराव घातला. वाहनातील व्यक्तीची चौकशी केली असता त्याचे नाव रिजवान शब्बीर खान (वय २६, रा. अंबिका नगर भाग-३, नई जिंदगी, सोलापूर) असे असल्याचे निष्पन्न झाले.

कारच्या ड्रॉवरमध्ये सापडली एमडी पावडर

वाहनाची झडती घेतली असता ड्रायव्हिंग सीटच्या डाव्या बाजूच्या ड्रॉवरमध्ये राखाडी रंगाच्या प्लास्टिक पिशवीत पांढऱ्या रंगाचा स्फटिक स्वरूपातील पदार्थ आढळून आला. चौकशीदरम्यान हा पदार्थ एमडी (मेफेड्रोन) असल्याची कबुली आरोपीने दिली. त्यानंतर फॉरेन्सिक पथकाकडून तपासणी करण्यात आली असता सदर पदार्थ मेफेड्रोन असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी एनडीपीएस कायद्यानुसार पंचनामा करून पुढील कारवाई केली.

### अमली पदार्थ कुणाकडून आणला?

पोलिसांच्या चौकशीत आरोपी रिजवान खान याने हा अमली पदार्थ साहील सिकंदर फिरजादे (रा. सोलापूर) आणि अफजल मुर्शीद (रा. मुस्लिम कब्रस्तानजवळ, सोलापूर) यांच्याकडून मिळाल्याची माहिती दिली. तसेच हा साठा कारच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यात आल्याचेही सांगितले.या प्रकरणी बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७८/२०२६ नोंद करण्यात आला असून एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २१(क) आणि २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दोन आरोपी अटकेत, महिलेचा सहभाग तपासात

या प्रकरणात पोलिसांनीरिजवान शब्बीर खान (वय २६, नई जिंदगी, सोलापूर) साहील सिकंदर फिरजादे (वय २५, अलमश अपार्टमेंट, मंत्रीचंद नगर, सोलापूर) यांना अटक केली आहे. न्यायालयाने दोन्ही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, तपासादरम्यान साहील फिरजादे याची पत्नी कायनात साहील फिरजादे उर्फ कायनात साहील खान (वय ३०) हिचा सहभाग असल्याची माहिती समोर आली असून तिचा शोध सुरू आहे.

### अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, भारत पाटील, सिद्धराम देशमुख, अनिल जाधव, महेश शिंदे आणि संजय साळुंखे यांनी पार पाडली.

# शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या

## नरेंद्र मोदींची देशवासियांना आवाहनं

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन केलं आहे. खाद्यतेलावर परकीय चलन जास्त प्रमाणात खर्च होतं. त्यामुळे त्याचा कमी वापर करावा.

तसेच शक्य तिथे ऑनलाईन मिटिंग घ्याव्यात, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत असं आवाहनही मोदींनी केलं. गुजरातमधील एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी देशवासियांना ही आवाहनं केली आहेत.

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर या आधीही पंतप्रधान मोदींनी देशावासियांना काही आवाहनं केली होती. त्यामध्ये पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा, वर्षभर सोन्याची खरेदी करू नका, तसेच शक्य तिथे सार्वजनिक वाहनांचा वापर करा असं मोदी म्हणाले होते. आज सलग दुसऱ्या दिवशीही पंतप्रधानांनी तेच आवाहन पुन्हा एकदा केल्याचं दिसून आलं.

देशातील 140 कोटी लोकांनी फक्त एक पाऊल पुढे टाकलं तर 140 कोटी पावलं आपण पुढे जाऊ. त्यामुळे कोणतंही संकट आपल्या विकासाला अडचण ठरू शकणार नाही, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



**नरेंद्र मोदींची देशवासियांना आवाहनं**

1. जोपर्यंत परिस्थिती ठीक होत नाही तोपर्यंत सोनं खरेदी करू नका.
2. भारतीयांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगचा ट्रेंड वाढतोय. त्यामुळे परकीय चलनाचा साठा भरपूर खर्च होत आहे. डेस्टिनेशन वेडिंगसाठी परदेशाला प्राधान्य देऊ नका. देशात अनेक ठिकाणं ही लग्नांसाठी योग्य आहेत. त्या ठिकाणांना पसंती द्या. लग्न इथे होत असेल तर भारताच्या मातीचाही आशीर्वाद लाभेल.
3. अनेकजण परदेशात जाऊन सुट्टी एन्जॉय करतात. सुट्टीसाठी परदेशात जाण्यापेक्षा देशातील ऐतिहासिक स्थळांना भेट द्या.
4. विदेशात राहणाऱ्या भारतीयांनी पाच विदेशी पर्यटकांना भारतात आणावं, त्यांना भारत दाखवावा.
5. प्रवासासाठी मेट्रोचा जास्तीत जास्त वापर करा
6. कामाच्या ठिकाणी ऑनलाईन मिटिंगला प्राधान्य द्या.
7. शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत.
8. शेतीत स्वदेशी खाद्य वापरा. रासायनिक खतांचा वापर करू नका. डिझेल पंपाऐवजी शेतात सोलार पंपाला प्राधान्य द्या.
9. खाद्यतेलावर जास्त परकीय चलन खर्च होतं. त्यामुळे त्याचा वापर कमी करा.
10. विदेशी साहित्यापेक्षा देशी उत्पादनांना प्राधान्य द्या. स्थानिक दुकानदारांकडूनच खरेदी करा.

# ऑटो चालकांच्या विविध मागण्यांसाठी एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाहतुक संघटना संयुक्त महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ऑटो चालकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे शासन आणि प्रशासनाचे लक्ष चालकांच्या समस्यांकडे वेधण्यात आले.

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये ऑटो एलपीजीचे दर कमी करणे, सर्व ऑटो एलपीजी पंप नियमितपणे सुरू ठेवणे, कल्याणकारी मंडळाची सभासद फी कमी करणे आणि सर्व चालकांचा कल्याणकारी मंडळात समावेश करणे.

तसेच, प्रत्येक चालकाला वषार्तून एक गणवेश देण्यात यावा आणि चालकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेण्यात यावा, अन्यथा वाहतूक संघटना संयुक्त महासंघातर्फे आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

यावेळी वेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, प्रदीप शिंगे,इरफान कल्याणी,इम्रान शेख,शंकर राऊत,अशोक बनसोडे,अकिल शेख,अफसर पिरजादे, मिन्हाज बागवान,मनोज खांडेकर,कादीर शेख रिक्षा चालक पदाधिकारी मोठ्यासंखेने उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी वाढणार- चंद्रकांत पाटील

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधनाला या निर्णयांमुळे गती मिळणार असून, त्याचा थेट लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना होणार आहे. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या संधी वाढणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अध्यासन केंद्रांना निधी उपलब्ध करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, मुंबई, जळगाव, नांदेड, अमरावती, गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, जळगाव, नांदेड व मुंबई




विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र कार्यरत असून अमरावती व गडचिरोली विद्यापीठात नव्याने आदिवासी अध्यासन केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. या विद्यापीठाला आदिवासी अध्ययन केंद्रासाठी ३ कोटी रुपयांचा निधी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निधीतून केंद्रांची उभारणी, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

आदिवासी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी संशोधनाधारित उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींची समृद्ध लोकसंस्कृती, भाषा आणि परंपरा जतन करणे तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संशोधन करणे हा या केंद्रांचा मुख्य उद्देश आहे. यामार्फत आदिवासी समाजाचा इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शैक्षणिक आणि संशोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, आदिवासी अध्यासन केंद्राच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञान, संस्कृती आणि जीवनशैलीचा अभ्यास होऊन त्याचे जतन करण्यास मदत होणार आहे. तसेच, शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी युवकांना नवीन संधी उपलब्ध होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साध्य होण्यास मदत होईल. आदिवासी विद्यार्थ्यांचा उच्च व तंत्र शिक्षणातील सहभाग वाढविणे आणि त्यांना रोजगारक्षम बनविणे हेही या केंद्रांचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

# पंढरपूर आणि सातारा येथे माजी सैनिकांसाठी एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यास मान्यता - राज्यपाल वर्मा

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येथे वारी आणि दर्शनासाठी येणाऱ्या माजी सैनिकांच्या सोयीसाठी त्याचप्रमाणे सातारा येथेही एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी व्यवहार्यता पडताळून प्रस्ताव पाठविण्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मान्यता दिली. माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची 50 वी वार्षिक बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन येथे झाली. या बैठकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली.

पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल डी. एस. कुशवाहा, रिअर ॲडमिरल शंतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल हे माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे. पुनर्स्थापना उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ



देणे, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे, निधीच्या योग्य व पारदर्शक वापरावर देखरेख ठेवणे या उद्देशाने ही समिती कार्य करते.

या बैठकीत लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिकांसाठी विश्रामगृहे, महासैनिक हॉल व लॉन्स तसेच पुणे येथील सैनिक कल्याण संचालनालयातील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच किमान वेतन कायद्यानुसार करण्यात आलेल्या वेतन पुनर्निर्धारणालाही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील तसेच धुळे येथील मिलिटरी बॉईज हॉस्टेलचे माजी सैनिक विश्रामगृहात रूपांतर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिक विश्रामगृहे तसेच महासैनिक हॉल व लॉन्स येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. या निर्णयामुळे ऊर्जा बचतीसह पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळणार आहे. याशिवाय दुरुस्ती व नवीन बांधकामांच्या ब्लॉक अंदाजपत्रकांबाबतही समितीने चर्चा करून सविस्तर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मंजुरी देण्याचे अधिकार राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी समितीमार्फत व्यावसायिक स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्याचे निर्देश देऊन या उपक्रमांमध्ये माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा अशी सूचना केली.

मंत्री शंभूराज देसाई यांनी सातारा येथे माजी सैनिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे सांगितले. या प्रस्तावास राज्यपालांनी सहमती दर्शवून पंढरपूरसह सातारा येथील केंद्रासाठी आर्थिक आणि अनुषंगिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

# अकलूजच्या फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बेंगलोर येथे निवड

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ फार्मसीच्या सहा विद्यार्थ्यांची मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड, बेंगलोर येथे निवड झालेली आहे. सोलापूर येथे महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ऑफ कॅम्पस पुल ड्राईव्हमध्ये अंतिम वर्ष बी. फार्मसीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये महाविद्यालयातील अंतिम वर्ष बी.फार्मसीचे विद्यार्थी शहानवाज मुलाणी, ऐश्वर्या कुलकर्णी,आर्यन घाडगे,दीप ननवरे,साक्षी देशमुखे,इरफान सय्यद आदी विद्यार्थ्यांची मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बेंगलोर येथे निवड झाली आहे.



मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बेंगळूर या अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीकडून विद्यार्थी निवडीची प्रक्रिया राबविण्यात आली होती.मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बेंगलोरमध्ये स्टराइल फार्मास्युटिकल प्रॉडक्ट्सची उत्पादने घेतली जातात. विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया अप्टीट्यूड टेस्ट, टेक्निकल राऊंड,एच.आर.राउंड अशा वेगवगळ्या परीक्षांमधून पार पडली. मायलान लॅबोरेटरीज लिमिटेड बेंगळूरमधील निवड समिती टेक्निकल प्रतिनिधी म्हणून एन.रवी, जे.नवीन कुमार, दिनेश कुमार तसेच एच.आर.प्रतिनिधी जी.के.नितीन, संतोष कुमार आणि कीर्ती कैथवास यांनी काम पाहिले. महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ.मुकुंद गाडे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

या निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, मार्गदर्शक संचालिका कु.स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालय विकास समितीचे सभापती विनोदकुमार दोशी तसेच सदस्य नारायण फुले, रामचंद्र गायकवाड, योगेश गांधी व शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल भानवसे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.